# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १८/०८/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील टोळापार शिवार नरखेड येथे दिनांक १३/०८/२०२२ चे १६.०० वा. ते दिनांक १४/०८/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सुभाष अंबादास फुले, वय ४१ वर्ष, रा. जुनोना घारड हे जियो कंपनीत नौकरीवर असुन त्यांचेकडे नरखेड हद्दीतील जिओ टावरचे निरीक्षण करण्याचे काम आहे. यातील टोळापार शिवारातील जिओ कंपनीचे टावरला लावलेल्या जनरेटरची एक्साईट कंपनीची काळया—पांढऱ्या रंगाची ८८ ए.एच. १२ व्हॅट ची बॅटरी किंमती ५,०००/— रुपयाची अज्ञात आरोपीने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक भुजंग बन्सोड मो.क्र. ९९२३१४४२९५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत राधेश्याम मंदीर पहलेपार सावनेर येथे दिनांक १७/०८/२०२२ चे १७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— हरिभाउ नत्थुजी अलघरे, रा. वार्ड क्र. १७, राधेश्याम मंदीर जवळ पहलेपार सावनेर हे राधेश्याम मंदीर पहलेपार सावनेर येथील पुजापाठ व देखरेखीचे काम पहात असतात. यातील फिर्यादी हे राधेश्याम मंदीरात पुजापाठ करण्यास गेले असता मंदीरातुन दोन लहान मुले मंदीराच्या गेट मधुन पळतांना दिसले. तेव्हा फिर्यादीने त्यातील एका मुलास पकडून अंगझडती घेतली असता त्याच्या पॅन्टच्या खिशात राधेश्याम मंदीरातील दोन गणपतीच्या पितळी मुर्ती किं अंदाजे १,२००/—रू. दिसल्या. अशा दोन अल्पवयीन मुलाने खुल्या राधेशाम मंदीर पहलेपार सावनेर येथुन दोन गणपतीच्या पितळी मुर्त्या चोरून नेत असतांना मिळुन आल्याने सदर विधीसंघर्षीत बालकाविरूद्ध गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे विधीसंघर्षीत बालकांविरुध्द कलम ३८०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राजेश हावरे मो.क्र. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**